**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २१/१/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१४ बुधवार दि.२५/१/२०१२ रोजी दुपारी१.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**बुधवार दिनांक-२५/१/२०१२ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ७७ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३ बुधवार दिनांक११/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ७८ | अहमदनगर महानगरपालिकेचे बुरूडगांव स.नं.३४ येथे महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घन कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून खत निर्मिती / उर्जा निर्मिती / बायोगॅस निर्मिती व सॅनेटरी लॅन्ड फिल साईट बी.ओ.टी. तत्वावर उभारणे करणेकरिता एजन्सी नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा धारक ऑरगॉनिक रिसायकल सिस्टीम यांनी वाटाघाटी अंती महानगरपालिकेस वार्षिक रक्कम रूपये६,००,०००/-रॉयल्टी व दर ५ वर्षानंतर १०% वाढीव रक्कम म.न.पास देणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७९ | अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.४४ दि.२३/९/२०११ अन्वये स्थगित केलेला प्रस्तावावर ऑफिस रिपोर्ट फेरसादर. |
| ८० | अहमदनगर महानगरपालिकेचे मा. महापौर तसेच अधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपुर्ती योजना लागू करणेबाबत व मा.पदाधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपूर्ती रकमेमध्ये इंधन,दुरूस्ती वाहन चालकाचे वेतन यामध्ये महागाई मुळे झालेल्या वाढीनुसार प्रतिपूर्ती रकमेमध्ये वाढ करणेबाबतचे प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ८१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी, प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह सद्यस्थितील स्थापत्य बांधकामासाठीचे टप्पा क्र.१ ची बांधकामाकरीता शासन अनुदान रूपये २ कोटी जकात हिस्सा रूपये २कोटी व उर्वरित रक्कम रू. १,६७,५५,४८७/-ची निधीची तरतूद सन२०१२-२०१३ चे अर्थसंकल्पात तरतूद करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८२ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पोहच रस्ते विकसित करणे अंतर्गत बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रूक ते आदर्श पार्क, पुणे हायवे व विनायक नगर व बुरूडगांव रोड बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत :- १] विषय क्र. ७७ -मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१३ बुधवार दिनांक ११/०१/२०१२ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत
२] विषय क्रमांक- ७८ ते ८२ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-७७ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

ठराव क्रमांक-७७ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३ बुधवार दिनांक ११/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३ बुधवार दिनांक ११/०१/२०१२रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेविले.
सबब कार्यवृत्त मा. स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक ११/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गंधे सु.मो. :- मागील सभा दिनांक ११/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३ बुधवार दिनांक ११/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.सौ.गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-७८ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

ठराव क्रमांक- ७८ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषयः-** अहमदनगर महानगरपालिकेचे बुरूडगांव स.नं.३४ येथे महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून खतनिर्मीती / उर्जा निर्मीती / बायोगॅस निर्मीती व सॅनिटरी लॅन्डफिल साईट बी.ओ.टी. तत्वावर उभारणे करणेकरिता एजन्सी नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा धारक ऑरगॅनिक रिसायकल सिस्टीम यांनी वाटाघाटी अंती महानगरपालिकेस वार्षिक रक्कम रूपये ६,००,०००/-रॉयल्टी व दर ५ वर्षानंतर १०% वाढीव रक्कम म.न.पास देणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा पाणी पुरवठा विभाग दिनांक /०१/२०१२

विषय-अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून खतनिर्मिती/ उर्जा निर्मिती / बायोगॅस निर्मिती व सॅनिटरी लॅन्डफिल साईट बी.ओ.टी.तत्वावर उभारणी करणेकरिता एजन्सी नियुक्ती करणेबाबत मागविण्यांत आलेल्या फेर ई- निविदा ५ क्र. बाबत.

संदर्भ :-१] दिनांक ३०/१२/२०११ रोजी मा.उपायुक्त कर यांच्या दालनात झालेली बैठक

२] ऑरगॅनिक रिसायलींग सिस्टम प्राय.लि. या कंपनीचे दिनांक ४/१/२०१२ चे पत्र.

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून खतनिर्मीती / उर्जा निर्मीती / बायोगॅस निर्मीती व सॅनिटरी लॅडफिल साईट बी.ओ.टी. तत्वावर उभारणी करणे करिता एजन्सी नियुक्ती करणे बाबत फेर निविदा क्र.५ मागविण्यांत आली होती. सदरच्या फेरनिविदा क्र.५ मध्ये ऑरगॅनिक रिसायकल सिस्टम या एजन्सी ने निविदा दाखल केली.

अहमदनगर महानगरपालिकेने निविदेमध्ये देकाराबाबत बी.ओ.टी. ठेकेदाराने खतनिर्मीती पासुन मिळणा-या उत्पन्नावर म.न.पा.स रॉयल्टी नमुद करणे अपेक्षित होते. ऑरगॅनिक रिसायलींग सिस्टम प्राय.ली. या पात्र निविदाधारकाणे निविदेमध्ये रॉयल्टी रक्कम निरंक नमुद केली आहे. सदर बाबत ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलावले असता दि.३०/१२/२०११ रोजी मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात झालेल्या बैठकीमध्ये निविदाधारकाने वाटीघाटीनंतर रॉयल्टी पोटी म.न.पा.स दरवर्षी ६.०० लाख रूपये व दर ५ वर्षानंतर १० टक्के वाढीव रक्कम मनपास देणेबाबत सहमती दर्शविलेली आहे व सदर बाबत संदर्भ क्र. २ नुसार महानगरपालिकेस कळविले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने घनकच-यापासुन खतनिर्मीती करणेबाबत बी.ओ.टी. तत्वावर एजन्सीची नियुक्ती करणेकरीता या पुर्वी मे. हायड्रोएअर टेक्नोटीक्स पी.सी.डी.ली. नवी मुंबई या एजन्सीची नियुक्ती केली होती. सदर एजन्सीने खत प्रकल्प निर्मीतीचे काम पुर्ण न केल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यात आली. अहमदनगर महानगरपालिकेने शहरात निर्माण होणा-या कच-याची प्रक्रिया व विल्हेवाट करणेबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या कडून म.न.पा.स वेळोवेळी नोटीसा प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे घनकच-यावर प्रक्रिया व विल्हेवाट बाबत त्वरीत कार्यवाही होणे

आवश्यक आहे. सदरचा प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर असल्यामुळे म.न.पास. प्रकल्प उभारणे व सॉनेटरी लॅंडफिल विकसित करणेबाबत कोणतीही आर्थिक गुंतवणूक करावी लागणार नाही. व महानगरपालिकेस वार्षिक ६.०० लाख रॉयल्टी पोटी उत्पन्न मिळु शकेल. म.न.पा. घनकच-यापासुन खतनिर्मीती व विल्हेवाट बाबत वेळोवेळी मागविलेल्या निविदास मिळालेला अल्प प्रतिसाद पहाता सदरची निविदा मंजुर करणे उचित वाटते.

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे शाखा अभियंता (प्रकल्प) यांचा अहवाल असे.

मा.पा.पु. विभाग प्रमुख :- अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

मुख्य लेखा परिक्षक / मुख्य लेखा अधिकारी :- प्रस्तावाप्रमाणे निविदा धारकाने दर वाटाघाटी नंतरचे मंजुर केलेले दराप्रमाणे निविदा दर मान्यतेकरिता निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) साहेब :- मूळ टिप्पणी प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर. दि.१०/१/२०१२

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती पुढे पाठवा. दि.११/०१/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब:- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून खतनिर्मिती/ उर्जानिर्मिती/ बायोगॅसनिर्मिती व सॅनिटरी लॅन्डफिल साईट बी.ओ.टी.तत्वावर उभारणी करणेकरिता एजन्सी नियुक्ती करणेबाबत विषय प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोढे सु.सो.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- घनकच-याचे विषया बाबतची संपुर्ण माहिती देण्यांत यावी.

शाखा अभियंता (प्रकल्प)श्री.मेहेत्रे :- घनकचरा प्रकल्प राबविण्याकरीता २० एकर जागा उपलब्ध आहे. मा.सुप्रीम कोर्टाने घालुन दिलेल्या नियम व अटी नुसार घनकचरा प्रकल्प योजना राबवावयाची आहे. दोन वर्षापुर्वी सदर घनकचरा प्रकल्पाचे काम मे.हायड्रोएयर टेक्नोटीक्स पी.सी.डी.लि. नवि मुंबई या संस्थेस देण्यांत आलेले होते. सदर संस्थेने त्याठिकाणी रक्कम रु.४० लाखा पर्यंतची गुंतवणुक केलेली आहे. नंतर त्यांनी सदरचे काम करणे बाबत असमर्थता दर्शविल्याने घनकचरा प्रकल्प अपुर्णावस्थेत पडुन आहे. यामुळे सदर संस्थेला महानगरपालिके मार्फत नोटीस देण्यांत आलेली आहे. त्यांची निविदा रद्द करण्यात आली आहे.यानंतर सदर प्रकल्पाच्या कामाकरीता ५ वेळा निविदा काढण्यांत आलेल्या आहेत. कुठल्याही संस्थेने निविदा भरलेल्या नव्हत्या. निविदेतील जाचक अटी-शर्ती कमी केल्यानंतर **ऑरगॉनिक रिसायलींग सिस्टम प्रा.लि.** या एका संस्थेने सदर प्रकल्प राबविणे बाबत सहमती दर्शविलेली आहे. घनकचरा प्रकल्पासाठी सदरची संस्था स्वतः संपुर्ण खर्च करणार आहे. सदर प्रकल्पापासुन महानगरपालिकेस प्रत्येक वर्षी रक्कम रु.६.०० लाख मिळणार आहेत. ५ वर्षानंतर सदर रक्कमेत १० टक्के वाढ करुन सदर संस्था महानगरपालिकेस पैसे देण्यास तयार आहे. सदर संस्थेबरोबर २५ वर्षांचा करार करावयाचा आहे.

मा.श्री.सप्रे द.ना.:- संपुर्ण शहरातुन होणारा कचरा संकलन घनकचरा प्रकल्प सुरु झाल्यानंतर कोण करणार ?

शाखा अभियंता (प्रकल्प)श्री.मेहेत्रे :- महानगरपालिके मार्फत ओला व सुका कचरा असे दोन्हीही एकत्र मिळुन संपुर्ण कचरा संकलन करुन डेपो पर्यंत महानगरपालिका पोहोच करणार आहे.

मा.श्री.सप्रे द.ना./ मा.श्री.डागवाले कि.आ.:- पुर्वीच्या संस्थेकडून काही मा.कोर्ट वगैरे अडचणी निर्माण होईल का ?

मा.श्री.डागवाले कि.आ./ मा.श्री.भोसले ग.पुं.:- हा प्रकल्प महाराष्ट्रात कोठे कोठे आहे.? ज्या ज्या महानगरपालिकांनी घनकचरा प्रकल्प राबविण्याकरीता बीओटी तत्वावर दिलेला आहे. किंवा महानगरपालिकेने स्वतः प्रकल्प सुरु केलेला आहे. अशा महानगरपालिकांमधील सदर प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे.? त्यांना स्वतः प्रकल्प राबविणे आर्थिक दृष्टया परवडते किंवा कसे याबाबत माहिती देण्यांत यावी.

शाखा अभियंता (प्रकल्प)श्री.मेहेत्रे :- नाशिक महानगरपालिकेने स्वतः घनकचरा प्रकल्प सुरु करुन कार्यान्वीत आहे. महानगरपालिकेने संपुर्ण गुंतवणुक केलेली आहे. सदर प्रकल्पा पासुन त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक फायदा होत नाही. त्यांचा प्रकल्प सध्या तोटयात चालू आहे. नाशिक प्रमाणेच सोलापूर मध्येही अशाच प्रकारे १ महिन्यापुर्वी प्रकल्प चालू आहे. सदर प्रकल्पा करीता शासन कुठल्याही प्रकारे अनुदान देत नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. / मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑरगॅनिक रिसायकल सिस्टीम यांचा प्रकल्प सध्या कुठे कुठे सुरू आहे ?

शाखा अभियंता (प्रकल्प)श्री.मेहेत्रे :- सोलापुर येथे सुरू आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.जगताप नि.वि. : ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे बुरूडगांव स.नं.३४ येथे महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून खतनिर्मीती / उर्जा निर्मीती / बायोगॅस निर्मीती व सॅनिटरी लॅन्डफिल साईट बी.ओ.टी. तत्वावर उभारणे करणेकरिता एजन्सी नियुक्ती करीता मागविण्यांत आलेल्या निविदा धारक ऑरगॉनिक रिसायलींग सिस्टम प्रा.लि.यांनी वाटाघाटी अंती महानगरपालिकेस वार्षिक रक्कम रूपये ६,००,०००/-(रूपये सहा लाख फक्त)रॉयल्टी व दर ५(पाच) वर्षानंतर १०% (दहा टक्के)वाढीव रॉयल्टी रक्कम महानगरपालिकेस देणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. जगताप नितीन विलास. सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-७९ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

ठराव क्रमांक- ७९ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषयः-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.४४ दि.२३/९/२०११ अन्वये स्थगित केलेला प्रस्तावावर, ऑफिस रिपोर्ट फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर म.न.पा. मोटार व्हेईकल विभाग

**फेरसादर,**

विषय- अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजुरी मिळणेबाबत श्री.दिपक मगर, व्यवस्थापक, शहर बससेवा यांचा अर्ज व त्यावरिल ऑफिस रिपोर्ट.

संदर्भ :- मा.स्थायी समिती सभा क्र.५ ठराव क्र.४४ दिनांक २३/९/२०११

उपरोक्त संदर्भ व विषयानुसार फेरसादर करण्यांत येते की, बससेवेच्या प्रवासी भाडे दरात वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता ठेवला असता, संदर्भिय ठराव क्र.४४ दिनांक २३/९/२०११ अन्वये उपरोक्त विषयावर चर्चा होवुन प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत आलेला आहे.

तथापी अभिकर्ता संस्थेने प्रवासी भाडे दरवाढीबाबत पाठपुरावा केल्याने तसेच मोटार व्हेईकल विभागाकडील अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा जा.क्र. १६ दि.१९/७/२०११ वरिल प्रस्ताव पाहता प्रवासी भाडे दरवाढीबाबत निर्णय घेणेकामी फेरप्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सविनय सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल विभाग यांचा अहवाल असे.

मा.पाणी पुरवठा विभाग :- प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (कर) साहेब :- ME कृ.चर्चा , चर्चा केली , प्रस्तावानुसार मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१३/१/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत स्थगित केलेला प्रस्तावावर ऑफिस रिपोर्ट फेरसादर विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.लोंढे सु.सो. :- शहर बससेवे बाबत संबंधितां बरोबर करण्यांत आलेल्या करारनाम्याची माहिती देण्यांत यावी व सद्यस्थितीतल्या विषया बाबत माहिती देण्यांत यावी.

मेकॅ.इंजि. श्री.निकम पी.जे.:- शहर बससेवेतील दरवाढीचा विषय मागील कमिटीमध्येही घेणेत आलेला होता. परंतु काही कारणामुळे सदरचा विषय स्थगित ठेवणेत आलेला आहे. शहर बससेवा वाहतुक संस्थेने पत्र देवुन झालेल्या डिझेल, पेट्रोल दरवाढ व इतर तदनुषंगिक खर्चात झालेल्या दरवाढीमुळे बससेवेचे दर वाढवुन मिळावेत. याबाबत विनंती पत्र देवुन विषय घेणेबाबत कळविलेले आहे. सदर संस्थेने शासन निर्णयानुसार मागणी केलेली आहे. सदर विषयास मा.स्थायी समितीची मान्यता घेतल्यानंतर नविन सुधारीत दर लागू करावयाचे आहेत.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- दरवाढी बाबत करण्यांत आलेली मागणी नियमानुसार आहे काय? सदर दर वाढीबाबत शासनाची काही नियमावली आहे काय ?

मेकॅ.इंजि.श्री.निकम पी.जे. :- मा.स्थायी समितीने निर्णय घ्यावयाचा आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- शहर बससेवा सुरु होते वेळी असणारे डिझेलचे दर व आताचे डिझेलचे दर यामध्ये किती वाढ झालेली आहे. याबाबत सखोल विवरण दिलेले नाही.

मेकॅ.इंजि.श्री.निकम पी.जे.:- शहर बससेवा सुरु होवुन एक वर्ष झालेले आहे. या कालावधीत डिझेलच्या दरात अंदाजे ४ ते ५ रुपये वाढ झालेली आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- शहर बससेवा चालविणारे किती दरवाढीची मागणी करतात एका गाडीसाठी किती डिझेल वापरतात. डिझेल खर्चानुसार वाढ देणे आवश्यक आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सध्या किती बसेस आहेत व त्या किती सिटस् च्या आहेत ?

मेकॅ.इंजि. श्री.निकम पी.जे.:- सध्या २२ बसेस असून त्या बसेसच्या आकारानुसार सिटची संख्या आहे.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ठेवण्यांत आलेला प्रस्ताव परिपूर्ण नाही. सदरचा विषय स्थगित करण्यांत येवून पुढच्या बैठकीत घेण्यांत यावा.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- शहर बससेवेसाठी २३ बस चालविण्यांत येतात. बसची कपॅसिटी किती आहे.

मॅके. इंजि.श्री. निकम पी.जे. :- बसच्या आकारानुसार ३० सीट बसुन व दहा उभे अशी आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- सदर बससेवा चालकाने बसवर जाहीरात करतांना महानगरपालिकेच्या नावाचा कुठेही उल्लेखा केलेला नाही. नियमानुसार कार्यवाही केलेली नाही.महानगरपालिकेच्या नावाचा ठळक उल्लेख प्रत्येक गाडीवर करणे आवश्यक आहे.

मा.उपायुक्त(कर)सौ. झगडे मॅडम :- प्रत्येक बसच्या होणा-या फे-या व त्यासाठी लागणारे डिझेल यांची वाढ व पुर्ण माहितीसह प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- सदर प्रस्तावामध्ये वाढीनुसार मिळणा-या उत्पन्नाचा उल्लेख नाही. त्यामुळे पुढील सभेत घेण्यांत यावा.

मा.सौ. गंधे सु.मो.:- सदरचा प्रस्ताव पुढील सभेत सविस्तर माहितीसह घेणेत यावा.

मा.सभापती साहेब :- शहर बससेवे बाबतची संपुर्ण माहिती घेवून सदरचा प्रस्ताव पुढील सभेत घेणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.४४दि.२३/९/२०११अन्वये स्थगित केलेल्या प्रस्तावाबाबत अभिकर्त्याकडून बसेसची संख्या, बससेवा सुरू करणे वेळचे इंधनाचे दर व सध्याचे दर यातील तफावत, बससेवेसाठी दररोज लागणारे इंधन, टायर, स्पेअर पार्टसचा खर्च व दररोजचे सरासरी उत्पन्न याबाबतची माहितीसह प्रस्ताव पुढील सभेत फेरसादर करण्यात यावा व अभिकर्ता कंपनीचे जबाबदार व्यक्तीस पुढील सभेत उपस्थित ठेवावे.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशारे आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-८० बुधवार दिनांक २५/०१/२०१२

ठराव क्रमांक- ८० बुधवार दिनांक २५/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषयः-** अहमदनगर महानगरपालिकेचे मा. महापौर तसेच अधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपुर्ती योजना लागू करणेबाबत व मा.पदाधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपूर्ती रकमेमध्ये इंधन,दुरूस्ती वाहन चालकाचे वेतन यामध्ये महागाई मुळे झालेल्या वाढीनुसार प्रतिपूर्ती रकमेमध्ये वाढ करणेबाबतचे प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर म.न.पा. मोटार व्हेईकल विभाग दिनांक १७/०१/२०१२

विषय- वाहन प्रतिपूर्ती रक्कमेत वाढ करणेबाबत.

संदर्भ :-१] सौ. अनिता राजेंद्र राठोड, सभापती स्थायी समिती यांची यादी दि.१३/९/२०११

२] श्री. बापूसाहेब सोन्याबापू वाकळे, सभागृह नेते यांची यादी दि.१३/९/२०११

३] श्री. दशरथ बाबूराव शिंदे , विरोधी पक्ष नेते यांची यादी दि.१३/०९/२०११

४] मा. महापौर साहेब यांची यादी जा.क्र. ९१५दि. ४/१/२०१२

मा.सादर,

सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी यांनी संदर्भिय नुसार इकडेस यादी देवुन " मा.शासन निर्णयाप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.२५ दि.२२/०१/२००८ नुसार पदाधिका-यांना वाहन प्रतिपूर्ती अदा करण्यात येत आहे. सदरची रक्कम ठरवून तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. वाहनावरील इंधन व दुरूस्ती खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे वाहन चालकाचे वेतनही महागाई प्रमाणे वाढलेले आहे. तरी पेट्रोल व डिझेल वाहनात प्रत्येकी रू.४०००/- वाहन प्रतिपूर्ती रक्कमेत वाढ करणे बाबत संबंधीतांना आदेश द्यावेत." अशी विनंती केलेली आहे.

तद्नुसार अहवाल सादर की, अहमदनगर महानगरपालिकेचे पुढील नमूद पदाधिकारी यांना मा. शासन निर्णयाप्रमाणे तसेच इतर महानगरपालिकेमध्ये पदाधिकारी यांनी स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन भत्ता देणेची प्रथा आहे, त्यानुसार मा.शासन निर्णय क्र. वाहन १००५/प्र.क्र.१३/२००५/विनियम मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २५ मे २००५ चा आधार घेवून खालीलप्रमाणे वाहन वापराबाबत प्रतिपूर्ती देणे विषयी मा.स्थायी समिती ठराव क्र.२५ दिनांक २२/१/२००८ अन्वये मंजूरी देण्यांत आलेली आहे.

| अ.नं. | म.न.पा. पदाधिकारी | पेट्रोल वाहन प्रतिपूर्ती (रूपये) | डिझेल वाहन प्रतिपूर्ती (रूपये) |
|---|---|---|---|
| १ | मा.उपमहापौर | २०,००० | १८००० |
| २ | मा.सभापती स्थायी समिती | २०,००० | १८००० |
| ३ | मा. विरोधी पक्ष नेता | १८००० | १६००० |
| ४ | मा.सभागृह नेता | १८००० | १६००० |
| ५ | मा.सभापती ,म.बा.क.स. | १८००० | १६००० |
| ६ | मा.उपसभापती म.बा.क.स. | १८००० | १६००० |
| ७ | मा.सभापती ,शिक्षण मंडळ | १८००० | १६००० |

सदरच्या ठरावानुसार पूर्वीचे व सध्याचे उपमहापौर , सभापती स्थायी समिती , सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते , सभापती व उपसभापती ,म.बा.क.स. यांना प्रतिपूर्ती देण्यात येत आहे.

मा.शासनाने सदर योजनेस अल्प प्रतिसाद मिळाल्याने सदर योजना बंद केलेली आहे. परंतु सर्व पदाधिकारी/अधिकारी यांना वाहने पुरविणे महानगरपालिकेला शक्य नाही. करिता महानगरपालिकेकडून सदरची योजना चालू आहे.

महानगरपालिकेची वाहने अधिकारी / पदाधिकारी यांनी वापरल्यास म.न.पा. वाहन चालकाचा पगार सरासरी रू.२००००/- + इंधन खर्च + मेन्टनंस मिळून रू.३०००० ते रू.३२००० खर्च येतो. तसेच भाडे पध्दतीने वाहन उपलब्ध करून दिल्यास प्रतिमाह रू.११०००/- ते रू.१२०००/- वाहन भाडे + इंधन खर्च असे मिळून रू.२०,००० ते रू.२२,००० खर्च येतो.

मा.पदाधिका-यांचे संदर्भिय पत्रानुसार प्रतिपूर्ती खर्चात वाढ करावयाची झाल्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव ठेवणे उचित वाटते.

तसेच महानगरपालिकेतील मा.उपायुक्त(सा.),मा.उपायुक्त(कर),मुख्यलेखाधिकारी,शहर अभियंता,मॅकेनिकल इंजिनिअर,आरोग्याधिकारी यांनाही वाहन वापर प्रतिपूर्ती दिल्यास महानगरपालिकेने सध्याच्या यंत्रणेवरील ताण व खर्च कमी होईल.

तरी मा.पदाधिका-यांची वरील संदर्भिय पत्रानुसार मागणी व वर नमूद अधिकारी यांना वाहन वापर प्रतिपूर्ती देणे बाबतचा निर्णय मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव ठेवणे उचित वाटते. असा मो.व्हे. विभागाने प्रस्ताव सादर केला असता अहवालात नमूद परिस्थिती असून अहवालानुसार कार्यवाही होणेस्तव मेकॅनिकल इंजिनिअर यांनी सादर केल्याप्रमाणे वाहन प्रतिपूर्ती दिल्यास म.न.पा.च्या खर्चामध्ये बचत होणार असल्याने प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविणेबाबत मु.ले.अ.यांनी मत दिले आहे. त्यानुसार मा.उपायुक्त (कर) यांनी मान्यतेस्तव सादर केल्यानुसार मा.आयुक्त यांनी सदर प्रस्तावावर चर्चा करणे बाबत सुचविले. दरम्यान मा. महापौर यांचे प्रतिपूर्ती मिळणेबाबतचे संदर्भिय पत्र प्राप्त झाल्याने मा.उपायुक्त व मा.आयुक्त यांचेमध्ये चर्चा होवुन शासन निर्णयानुसार वाढ असल्यास सादर करणेबाबत आदेश दिले प्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर यांनी सदरचा प्रस्ताव फेरसादर केला. त्यानुसार मा.शासन निर्णय २५ मे २००५ चा आधार घेता तसेच इंधनाचे दरात व वाहन चालकाच्या पगारात झालेली दर वाढ पाहता प्रतिपूर्ती रक्कमेत रू.२०००/- इतकी वाढ देणे योग्य राहिल. त्याचप्रमाणे म.न.पा.चे मा. महापौर यांचे यादीनुसार प्रतिपूर्ती रक्कमेची मागणी केलेली आहे. तद्नुसार मा. शासन निर्णय क्र. वाहन १००५/प्र.क्र.१३/२००५ विनियम/मंत्रालय, मुंबई ३२ दि.२५ मे २००५ चा आधार घेवून तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.२५ दि.२२/१/२००८ चा आधार घेवून मा. महापौर यांना स्वत:चे वाहन वापरल्यास व त्या बदल्यात खर्चाची प्रतिपूर्ती पेट्रोल वाहनाकरिता रू.३००००/- व डिझेल वाहनासाठी रू.२८०००/- देणेस हरकत नाही. उपरोक्त बाबत मा. स्थायी समिती कडे निर्णयास्तव ठेवणे उचित वाटते. याप्रमाणे सादर केल्यानुसार मा.मु.ले.अ., मा.उपायुक्त व मा.आयुक्त यांनी मंजूरी देवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

येणेप्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा.महापौर तसेच अधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपुर्ती योजना लागू करणेबाबत व मा.पदाधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपूर्ती रकमेत वाढ करणे बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा). डॉ. डोईफोडे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- मा.उपायुक्त (सा), उपायुक्त (कर), शहर अभियंता,मेकॅनिकल इंजिनियर, मुख्यलेखाधिकारी व आरोग्याधिकारी यांना सदर प्रतिपुर्तीचा लाभ देण्यांत यावा. सदर अधिका-यांना महानगरपालिकेचे वाहन किंवा स्वतःचे वाहन वापरणे बाबतचा पर्याय ठेवणेत यावा.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:- यापुर्वी देण्यांत येत असलेल्या प्रतिपुर्ती रक्कमेत रक्कम रु.२,०००/- ची वाढ सुचविण्यांत आलेली आहे.

| **अ.नं.** | **मनपा पदाधिकारी** | **पेट्रोल वाहन प्रतिपुर्ती (रुपये)** | **डिझेल वाहन प्रतिपुर्ती (रुपये)** |
|---|---|---|---|
| १ | मा.महापौर | ३०,०००/- | २८,०००/- |
| २ | मा.उपमहापौर | २२,०००/- | २०,०००/- |
| ३ | मा.सभापती स्थायी समिती | २२,०००/- | २०,०००/- |
| ४ | मा.विरोधी पक्ष नेते | २०,०००/- | १८,०००/- |
| ५ | मा.सभागृह नेता | २०,०००/- | १८,०००/- |
| ६ | मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती | २०,०००/- | १८,०००/- |
| ७ | मा.उपसभापती, महिला व बालकल्याण समिती | २०,०००/- | १८,०००/- |
| ८ | मा.सभापती, शिक्षण मंडळ | २०,०००/- | १८,०००/- |

मा.श्री.डागवाले कि.आ.:-महानगरपालिकेच्या क्षेत्रफळाचा विचार करता तसेच महापौरांकडे असणारी विविध प्रकारची कामे पहाता मा.महापौरांना देण्यात येणा-या प्रतिपुर्ती रक्कमेत वाढ करण्यांत यावी.

मा.श्री.लोंढे सु.सो.:- मा.स्थायी समिती सदस्यांनी सुचविलेली केलेली दरवाढ नियमानुसार आहे काय?

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- प्रस्तावात सुचविलेली दरवाढ नियमानुसार आहे. मा.महापौर यांना प्रतिपुर्ती रक्कमेत २८,०००/- ते ३०,०००/- रुपयांची शिफारस करणेंत आलेली आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- मा.महापौरांकडील कामाचा व्याप पहाता त्यांना देण्यांत येणा-या प्रतिपुर्ती रक्कमेत वाढ करणेत यावी.

मा.श्री.सातपुते दि.ना.:- महापौरांकरीता पेट्रोल वाहन असल्यास रक्कम रु. ३५,०००/- व डिझेल वाहन असल्यास रक्कम रु. ३३,०००/- करण्यांत यावी.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- महापौरांबरोबरच सभापती, स्थायी समिती व उपमहापौर यांना देण्यांत येणा-या प्रतिपुर्ती रक्कमेत वाढ करावी.

मा.श्री.सप्रे द.ना.:- मा.महापौरांच्या प्रतिपुर्ती रक्कमेत वाढ करण्यांत यावी.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- महापौरांना देण्यांत येणा-या प्रतिपुर्ती रक्कमेत वाढ करुन ती ३५,०००/- उपमहापौरांकरीता ३०,०००/- व स्थायी समिती सभापतीं करीता ३०,०००/- करण्यांत यावी.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- पदाधिकारी जे वाहन वापरतील ते वाहन त्यांचे किंवा त्यांचे कुटुंबियांचे नांवे असणे आवश्यक आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- कुटुंबाची व्याख्या सांगा. कुटुंबात कोणकोण सदस्य येतात.

मुख्यलेखाधिकारी श्री. शेलार / मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- महाराष्ट्र नागरी सेवा नियमात कुटुंबाची व्याख्या दिलेली आहे. त्यानुसार पती, पत्नी , मुलगा, मुलगी अथवा आई , वडील या व्यक्ती येतात.

मा.सभापती साहेब :- यापुर्वीच्या ठराव हा २००८ असून त्यांस ४ वर्ष झालेली आहेत.त्यावेळेस व आजच्या डिझेल, पेट्रोल, दुरूस्ती खर्च तसेच विमा, वाहन चालकाचे वेतन या सर्व बाबींचा विचार करून निर्णय घेणे योग्य आहे. ऑफिस रिपोर्ट पहाता सर्व मा.पदाधिकारी / अधिकारी यांना सद्यस्थितीत महानगरपालिका वाहन पुरवू शकत नाही. त्यामुळे मा.महापौर व अधिकारी यांना वाहन प्रतिपुर्तीची योजना लागू करण्यांत यावी व पुर्वीच्या वाहन प्रतिपुर्ती रकमेत वाढ याबाबत सर्व सदस्यांनी एकमताने निर्णय घ्यावा.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- मा.महापौरांना देण्यांत येणा-या प्रतिपुर्ती रक्कमेत वाढ करुन ती रक्कम रूपये ४०,०००/- व रू.३८,०००/- करण्यांत यावी.

मा.सौ. गंधे सु.मो. :-मा.महापौर / अधिकारी यांना वाहन प्रतिपूर्ती योजना लागू करावी. तसेच पुर्वीच्या रकमेमध्ये रूपये ४०००/- वाढ करावी.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- मा.महापौर/अधिकारी यांना वाहनप्रतिपूर्ती योजना लागू करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा. महापौर तसेच मा.उपायुक्त (सा.), मा.उपायुक्त (कर), मुख्यलेखाधिकारी , शहर अभियंता, मेकॅनिकल इंजिनिअर व आरोग्याधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपुर्ती योजना लागू करण्यांत यावी. मा.पदाधिकारी / अधिकारी स्वतःचे वाहन वापरल्यास त्या वाहनाची देखभाल , दुरूस्ती, इंधन, टोल शुल्क, वाहन चालकाचे वेतन व वाहनाचा विमा उतरविणे या सर्व गोष्टी पदाधिकारी / अधिकारी यांनी कराव्यात. या सर्व बाबींचा विचार करून सर्वानुमते पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.महापौर तसेच मा.उपायुक्त (सा.) ,मा.उपायुक्त(कर), मुख्यलेखाधिकारी ,शहर अभियंता, मेकॅनिकल इंजिनिअर व आरोग्याधिकारी यांनी स्वतःचे वाहन वापरल्यास वाहन प्रतिपुर्ती योजना लागू करण्यांत यावी.

तसेच चार वर्षापासून डिझेल,पेट्रोल, दुरूस्ती खर्च तसेच विमा, वाहन चालकाचे वेतन यामध्ये झालेल्या वाढीव खर्चाचा विचार करता यापुर्वी ज्या मा.पदाधिका-यांना महानगरपालिका वाहन प्रतिपुर्तीची रक्कम देणेत येत होती. त्या रकमेत प्रत्येकी रक्कम रूपये ४,०००/-(रू. चार हजार फक्त) या प्रमाणे वाढ करण्यांत यावी.

खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे वाहन प्रतिपुर्ती (वाहन भत्ता) रक्कम देण्यांत यावी.

| **अ.नं.** | **मनपा पदाधिकारी / अधिकारी** | **पेट्रोल वाहन प्रतिपुर्ती (रुपये)** | **डिझेल वाहन प्रतिपुर्ती (रुपये)** |
|---|---|---|---|
| १ | मा.महापौर | ४०,०००/- | ३८,०००/- |
| २ | मा.उपमहापौर | २४,०००/- | २२,०००/- |
| ३ | मा.सभापती स्थायी समिती | २४,०००/- | २२,०००/- |
| ४ | मा.विरोधी पक्ष नेते | २२,०००/- | २०,०००/- |
| ५ | मा.सभागृह नेता | २२,०००/- | २०,०००/- |
| ६ | मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती | २२,०००/- | २०,०००/- |
| ७ | मा.उपसभापती, महिला व बालकल्याण समिती | २२,०००/- | २०,०००/- |
| ८ | मा.सभापती, शिक्षण मंडळ | २२,०००/- | २०,०००/- |
| ९ | मा.उपायुक्त (सा.) | २२,०००/- | २०,०००/- |
| १० | मा.उपायुक्त (कर) | २२,०००/- | २०,०००/- |
| ११ | मुख्यलेखाधिकारी | २२,०००/- | २०,०००/- |
| १२ | शहर अभियंता | २२,०००/- | २०,०००/- |
| १३ | मॅकेनिकल इंजिनिअर | २२,०००/- | २०,०००/- |
| १४ | आरोग्याधिकारी | २२,०००/- | २०,०००/- |

या प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचे मा. पदाधिकारी / अधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरणेस परवानगी देण्यांत येत आहे. प्रतिपुर्ती पोटी वापरावयाचे वाहन संबंधीताच्या अथवा महाराष्ट्र नागरी सेवा नियमात नमूद कुटुंब या व्याख्येत नमूद कुटुंबियाच्या नावे असणे आवश्यक आहे.मा.पदाधिकारी/अधिकारी स्वतःचे वाहन वापरल्यास त्या वाहनाची देखभाल, दुरूस्ती, इंधन, टोल शुल्क, वाहन चालकाचे वेतन व वाहनाचा विमा उतरविणे या सर्व गोष्टी मा. पदाधिकारी / अधिकारी यांनी कराव्यात. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :-मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

अनुमोदक :-मा.श्री.डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिति सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-८१ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

ठराव क्रमांक- ८१ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी, प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह सद्यस्थितील स्थापत्य बांधकामासाठीचे टप्पा क्र.१ ची बांधकामाकरीता शासन अनुदान रूपये २कोटी जकात हिस्सा रूपये २कोटी व उर्वरित रक्कम रू.१,६७,५५,४८७/-ची निधीची तरतूद सन२०१२-२०१३ चे अर्थसंकल्पात तरतूद करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर म.न.पा. सार्व. बांधकाम विभाग दि.११/१/२०१२

विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी, प्रोफेसर कॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह बांधणे बाबत.

संदर्भ-१] शासन निर्णय क्र.पीएएमसी-३०९८/२५/प्र.क्र.६/८९/नवि-२२ मंत्रालय, मुंबई दि.१५ मार्च १९९० (शासनाकडुन २३.३३% अनुदान)

२] समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. एनटीएम-१०९०/५४०/१८७/सां.का.१ दि.७ मार्च २००१

३] महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. नागृबा २००९ /प्र.क्र.१८१ /सां.का.३ मंत्रालय विस्तार, भवन मुंबई ३२ दि.२३ मार्च २०१०चे पत्र.

सादर,

अहमदनगर महानगरपालिका शहरामध्ये बंदिस्त नाटयगृह बांधणे बाबत अखिल भारतीय "मराठी नाटय परिषद" अहमदनगर शाखा व इतर नाटय रसिक यांनी मागणी केल्यानुसार तसेच मा. स्थायी समिती सभा क्र.१ विषय क्र.५ दिनांक ८/४/२००८ रोजी झालेल्या ठरावानुसार सावेडी उपशहरातील प्रोफेसर कॉलनी चौक येथील रिकाम्या जागेमध्ये ५०० आसन क्षमता असलेले अद्यावत बंदिस्त नाटयगृह बांधणेबाबत सल्लागार म्हणुन मे.अविष्कार ग्रुप, अहमदनगर यांची नेमणूक झालेली आहे. त्यानुसार सदर कामांबाबत अंदाजपत्रक व आराखडे तयार करून इकडेस सादर करणे बाबत त्यांना जा.क्र. सा.बां. वि. ६२४ दि.८/७/२०११ अन्वये पत्र दिले असता त्यांनी दि.१८/७/२०११ रोजी सदरच्या कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करून इकडेस सादर केले आहेत. सदर कामांबाबत संदर्भिय क्र.२ समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.एन टी एम १०९०/५४०/१८७/सा.क्र.१ दि. ७ मार्च २००१ तसेच मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे दि. २३ मार्च २०१० चे पत्रानुसार नाशिक येथील झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत अहमदनगर येथे नाटयगृह बांधणे बाबत निर्णय झालेला आहे. त्यासाठी २.०० कोटी इतका निधी ३ वर्षात उपलब्ध करून द्यावयाचा निर्णय झालेला आहे. सदर कामांबाबत ५०० आसन क्षमता असलेले नाटयगृह बांधणेचे रक्कम रूपये ७,९६,१५,७८५/- खर्चाचे अंदाजपत्रक खालील प्रमाणे आहे.

| बंदिस्त नाटयगृह बांधणेबाबतचे एकुण अंदाजपत्रक | समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.एनटीएम-१०९०/५४०/ १८७/ सां.क्र.१ दि.७ मार्च २००१ | उर्वरित रक्कम | विकास आराखडा अंमल बजावणी योजने अंतर्गत २३.३३% | मनपा स्वतःचे हिश्याची रक्कम ७६.६७% |
|---|---|---|---|---|
| ८ कोटी | २ कोटी | ६ कोटी | रू.१,३९,९८,०००/- | रू.४,६०,०२,०००/- |

त्यानुसार महानगरपालिकेच्या विकास योजनेतील साईट विकसीत करण्याकरीता संदर्भिय पत्र क्र.१च्या शासन निर्णय अन्वये २३.३३टक्के अनुदान मिळणे अपेक्षित असुन त्यानुसार रू. ६० कोटीच्या २३.३३%अनुदानानुसार अंदाजे अपेक्षित रक्कम रू.१,३९,९८,०००/-महानगरपालिकेस मंजुर करणेबाबत मा. जिल्हाधिकारी ,अ.नगर यांचेकडेस जा.क्र. ७४६ दि.२७/७/११ अन्वये पत्र दिले आहे.

सद्यस्थितीत सदर नाटयगृहाबाबतचे आराखडे जा.क्र. सा.बां.१५३२ दि.२६/१२/२०११अन्वये नगररचना विभागाकडेस तपासणीसाठी पाठविले असून दि.४/१/२०१२ रोजी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली मा. पदाधिकारी व मा. आयुक्त , मा.उपायुक्त (सा.) व (कर) तसेच खातेप्रमुख यांचे समवेत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णय दि.२३/३/२०१० अन्वये सावेडी नाटयगृह बांधकामासाठी रक्कम रू.२.०० कोटी इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास व आराखडयास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, त्यापैकी मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. जिनिस/नाटयगृह /१०-११/निवि/संस-४/२१३८ दि.१५/११/२०१० अन्वये रक्कम रू. ६०.०० लाख मनपास प्राप्त आहेत.

मनपा मधील जकात व पारगमन शुल्क वसुलीसाठी नेमलेल्या ठेकेदार यांनी युआयडीएसएसएमटी/ नाटयगृह / महापौर निवास / नगरोत्थान अभियान या कार्यक्रमासाठी रक्कम रू.२.०० कोटी अदा करण्याचे मान्य करण्यात आले आहे.

अशा प्रकारे शासन अनुदान रक्कम रू.२.०० कोटी व जकात ठेकेदाराकडील रक्कम रू. २.०० कोटी अशी एकुण रक्कम रू.४.०० कोटी रक्कम उपलब्ध होवू शकते, त्यामुळे उपरोक्त रकमेव्यतिरिक्त रक्कम सन २०१२-१३ च्या अर्थ संकल्पातून उपलब्ध करून घ्यावी व नाटयगृह बांधकामातील टप्पे निहाय कामे प्रस्तावीत करणेबाबत उपायुक्त (सा) यांचे स्तरावर बैठक घेण्याचे सुचित करण्यात आले.

नाटयगृहाबाबत मा.उपायुक्त (सा.), यांचेकडेस मा. नगररचनाकार , मा. मुखलेखाधिकारी व वास्तू विषारद यांचेसमवेत दि.६/१/२०१२ रोजी पुनश्च बैठक संपन्न झाली. नाटयगृहाबाबत वास्तूतज्ञ यांनी मनपाकडेस रक्कम रू.७,९६,१५,७८६/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. नाटयगृह बांधणेबाबत दि.६/१/२०१२ रोजी झालेल्या चर्चेनुसार सन २०११-१२ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक सादर करणेबाबत मा.उपायुक्त यांनी सुचविले, त्यानुसार सदर कामाचे चालू दरसूचीनुसार रक्कम रू. ८,५७,००,७८५/-चे सुधारित अंदाजपत्रक वास्तूविषारद यांनी सादर केलेले आहे. त्यामध्ये नाटयगृहाचे स्थापत्य बांधकामासाठीचे अंदाजपत्रक रू.५,६७,५५,४८७/-असून ॲकॉस्ट्रीक ट्रिटमेंटसाठी रू.८५,१३,३२३/- बैठक व्यवस्थेसाठी रू.१,२४,८६,२०७/- व विद्युत कामासाठी रू.७९,४५,७६८/- या कामांचा समावेश आहे. यापैकी स्थापत्य बांधकामासाठीचा टप्पा क्र.१ ची कामे प्रथम पुर्ण करून उर्वरीत कामे टप्पा क्र.२ मध्ये समाविष्ट करून त्याप्रमाणे निविदेबाबत कार्यवाही करणेबाबत चर्चा झाली.

नाटयगृहाचे बांधकाम पुर्ण झाल्याशिवाय इतर कामे करता येणार नसल्याने सद्यस्थितीत स्थापत्य बांधकामासाठीचे रक्कम रू.५,६७,५५,४८७/-चा टप्पा क्र.१ची तरतुद उपरोक्त प्रमाणे शासन अनुदान रू.२.००कोटी व जकात हिस्सा रू.२.००कोटी व उर्वरीत रक्कम सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पातून तरतूद करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस पाठविणे योग्य. तथापि आदेशार्थ सादर. / **अ**

येणेप्रमाणे प्रभाग अभियंता यांचा अहवाल असे.

इनचार्ज अभियंता :- अहवालानुसार नाटयगृह बांधकामासाठीचे उपलब्ध निधी व्यतिरिक्त येणारे रक्कम रूपये १,६७,५५,४८७/- च्या निधीची तरतूद सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पात तरतूद करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविणे योग्य आदेशार्थ सादर.

मा. शहर अभियंता :- **"अ"** अहवालाप्रमाणे मान्यता देणे योग्य वाटते.

मुख्यलेखापरिक्षक /मुख्यलेखाअधिकारीः-प्रस्तावाप्रमाणे नाटयगृहाच्या पहिल्या टप्पातील बांधकामा करिता उपलब्ध निधी व्यतिरिक्त रकमेची तरतूद सन२०१२-१३चे अर्थसंकल्पामध्ये करणेकरिता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावानुसार उपरोक्त विषय मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. दि.११/०१/२०१२ **/अ**

मा.आयुक्त साहेब :-१] मा.स्थायी समितीपुढे पाठवा २] वरिल प्रमाणे आराखडा तयार करून त्यास मा.स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाल्यास तात्काळ निविदा काढावी. दि.१२/०१/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सावेडी, प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह बांधकामाकरीता शासन अनुदान निधीची तरतूद व महानगरपालिका निधी सन२०१२-२०१३ चे अर्थसंकल्पात तरतूद करणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

प्र.शहर अभियंताश्री.मगर एन.बी. - मनपा हद्दीतील सावेडी प्रोफेसर कॉलनी येथे बंदीस्त नाट्यगृह बांधणे करीता समाजकल्याण सांस्कृतीक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ०७ मार्च २००१ नुसार २ कोटी मंजूर झालेले आहेत. त्यापैकी रक्कम रु. ६० लाखांचा पहिला हप्ता महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. ७ कोटी ९६ लाख मंजूर आहेत. पैकी २ कोटी शासनाचे मंजूर झालेले आहेत. विकास आराखडा अंमलबजावणी योजनेत २३.३३ टक्के म्हणजे १ कोटी ३९ लाख ९८ हजारांची मागणी केलेली आहे. ७ कोटी ९६ लाखांपैकी ५ कोटीचे सिव्हील वर्क आहे. ५ कोटी ६७ लाखाची तरतुद करावी लागेल. सदर कामाकरीता सन २०१२ - २०१३ च्या अर्थसंकल्पामध्ये रक्कम रु.१.६७ कोटीची तरतुद करणे आवश्यक आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- प्रोफेसर कॉलनी शॉपिंग सेंटर येथे बांधावयाच्या नाट्यगृहा बाबत बजेट तरतुद करणे आवश्यक असल्याने सदरचा विषय आजच्या कमिटीमध्ये का घेतला गेला. सदर कामाकरीता नेहरुमार्केटची रक्कम या नाट्यगृहाकरीता व उर्वरीत रक्कम मा.महापौर निवासकरीता वर्ग करण्यांत यावी. सन २०१२-२०१३ च्या अर्थ संकल्पामध्ये बंदीस्त नाट्यगृह बांधणे हे हेड ठेवण्यांत यावे.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे साहेब :- जाहिर निविदा मागविण्यापुर्वी स्थायी समितीची पुर्व मंजूरीने रूपये १.६७कोटीची तरतूद करणे आवश्यक आहे.

प्र.शहरअभियंता श्री.मगर एन.बी.:-नेहरुमार्केटचा प्रिमियम मिळाला नाही तर सदर काम महानगरपालिका फंडातुन करणे बाबतचा पर्याय ठेवण्यात यावा.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- नेहरुमार्केटचा प्रिमियम न मिळाल्यास महानगरपालिका फंड वापरणेत यावा.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- नेहरुमार्केट पासुन मिळणारी प्रिमियमची रकमे पैकी उर्वरीत रक्कम मा.महापौर निवासा करीता वापरण्यांत यावी.

मा.श्री.लोंढे सु.सो./ मा.श्री.डागवाले कि.आ. :- मा.सर्वसाधारण सभे प्रमाणेच स्थायी समिती सभेच्या कामकाजाचे ऑडिओ रेकॉर्डींग करणे बाबत संबंधित विभागास सुचना देण्यांत याव्यात व पुढील सभेचे रेकॉर्डींग करण्यांत यावे.

मा.सौ. गंधे सु. मो. :- बंदिस्त नाटयगृहा बांधकामाकरीता मा. शासन अनुदान रू.२ कोटी जकात हिस्सा रू.२ कोटी व सन २०१२-२०१३ चे अंदाजपत्रकात रू.१.६७कोटीची तरतूद करण्यांत यावी व सन २०१२-१३ मध्ये नेहरू मार्केट खाजगी विकासकामार्फत विकसीत करतांना येणा-या रकमेची ही रू.१.६७ कोटी नाटयगृह व उर्वरित रक्कम मा. महापौर निवास करीता ठेवण्यांत यावी.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- सन २०१२-१३ मध्ये नेहरू मार्केट खाजगी विकासकामार्फत विकसीत करतांना येणा-या रकमेची ही रू.१.६७ कोटी नाटयगृह व उर्वरित रक्कम मा. महापौर निवास करीता ठेवण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सर्व सदस्यांच्या मते विचारात घेता पुढील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यांत येत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी, प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह बांधकामाच्या सद्यस्थितीतील स्थापत्य बांधकामासाठी टप्पा क्र.१ या शासन अनुदान रक्कम रूपये २ कोटी तसेच जकात हिस्सा रूपये २ कोटी असे एकुण रूपये ४ कोटी रक्कम उपलब्ध करणेत यावी. तसेच महानगरपालिकेचे सि.स.नं.२०८ नेहरू मार्केट , चितळे रोड येथील एफ.बी.टी. तत्वावर (व्यापारी संकुल व भाजी मंडई) विकसीत करण्याचे कामा पोटी मंजुर निविदाकार यांचेकडून उपलब्ध होणा-या प्रिमियम रकमेतुन १.६७,५५,४८७/- रूपये देखील नाटयगृहाचे कामासाठी तरतुद करणेत यावी. व उर्वरित रक्कम मा. महापौर यांचे निवासस्थान बांधणे या कामाची तरतुद करणेत यावी. नेहरू मार्केटची प्रिमियम रक्कम न मिळाल्यास सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकात नाटयगृह बांधकामाकरीता रूपये १.६७,५५,४८७/- (रूपये एक कोटी सदुसष्ट लाख पंचावन्न हजार चारशे सत्याऐंशी फक्त) इतक्या रकमेची पर्यायी तरतूद करण्यांत यावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४**

विषय क्रमांक-८२ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

ठराव क्रमांक- ८२ बुधवार दिनांक २५/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पोहच रस्ते विकसित करणे अंतर्गत बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रुक ते आदर्श पार्क, पुणे हायवे व विनायक नगर व बुरूडगांव रोड बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर म.न.पा. सार्व. बांधकाम विभाग दि.१८/०१/२०१२

मा.फेर सादर,

विषय- **ई-निविदा क्र.१२३-** बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रुक ते आदर्श पार्क, पुणे हायवे ते विनायकनगर व बुरूडगाव रोड बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.महासभा ठराव क्र.७५ दि.२९/३/२०११ अन्वये आवश्यक पोहोच रस्ते विकसित करणे या लेखाशिर्षान्वये एकुण १६ कामांसह एकुण खर्च रू.३.११ कोटीस प्रशासकीय मान्यता. तसेच मा.आयुक्त यांची दि.१३/९/२०११ अन्वये अंमलबजावणीस मान्यता.

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. ४०,००,०००/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :-३९,६२,२४८/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :-२०१०-११ सा.बां.वि. म.जि.प्रा.

५] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू. :- ३९,६२,२४८/-

६] ऑन लाईन ई- निविदा क्र.११७ ते १२३ सन २०११-१२ प्रसिध्दी :- दिनांक १४/११/२०११

७] निविदा विक्री कालावधी :- १४/११/२०११ ते २९/११/२०११

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- ०२/१२/२०११ ते ७/१२/२०११

९] निविदा उघडण्याची तारीख :- १३/१२/२०११

१०] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. ए.पी. सोनीमंडलेचा , अहमदनगर | २८.९९% जादा |
| २ | मे. बेस्ट कंन्स्ट्र., अहमदनगर | १९.९९% जादा |
| ३ | श्री. राजेंद्र लोणकर, अहमदनगर | ३५% जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.बेस्ट कंन्स्ट्र., अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **१९.९९%** जादा आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०१०-२०११ चे दरसुची नुसार तयार करण्यात आले होते. सन २०११-१२ चे सुधारित दरसुचीशी अंदाजपत्रकाची तुलना करता सदरचा दर हा **१४.२७%** जादा येत आहे.

संबंधित निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्र.,अहमदनगर यांना दराचे वाटाघाटीकरीता जा.क्र.सा.बां.वि. १६३८ दिनांक ०६/०१/२०१२ अन्वये पत्र दिले असता मे. बेस्ट कंन्स्ट्र., यांनी सध्या डांबराचे दर, मजुराचे दर, वाहतुकीचे दर तसेच खाणीमध्ये कच्च्या मालाचे दर ईत्यादी सर्वच दरांत वाढ झाली असल्याने निविदेमध्ये भरलेले दर योग्य असुन निविदा मंजुर करावी. असे दि.६/१/२०१२ च्या पत्रान्वये कळविले होते तथापि लघुत्तम निविदा धारक मे. बेस्ट कंन्स्ट्र. यांनी दिलेल्या (पुर्विचाच **१९.९९%** जादा दर) दरानुसार त्यांना मा.उपायुक्त (सा) यांचे दालनात दि.१६/०१/२०१२ रोजी समक्ष येउन सुधारित देकार पुनःश्च देणे विषयी दि.११/०१/२०१२ रोजी समक्ष सांगितले असता मे.बेस्ट कंन्स्ट्र., यांना निविदेमध्ये भरलेले दर **१९.९९ %** जादा योग्य असुन ती कारणे पुढील प्रमाणे १) सेल टॅक्स ५% २) वेल्फेअर टॅक्स १% , ३) इंश्युरंन्स १% आपल्या निविदेमध्ये ग्राह्य नाहीत. तसेच सया मटेरियल + लेबर+ फ्युल + ट्रान्सपोटेशन यामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. डांबराच्या दरामध्ये दर १५ दिवसांनी रू.१५०० ते २०००/- मे.टन वाढ होते दर पृथःकरण केले नंतर साधारण आजतागयत दि.१६/०१/२०१२ पर्यत रू.५०००/- मे.टन दरामध्ये वाढ झालेली आहे. अशा आशयाचे पत्र सादर केले. तथापि संबंधीत ठेकेदार यांनी पुनःश्च दर कमी करून दि.१८/०१/२०१२ रोजी सुधारित देकार **१५.४१%** जादा दिला आहे.

तरी संबंधीत ठेकेदार यांनी वरील नमुद प्रमाणे दिलेला सुधारित देकार **१५.४१%** जादा दराशी सन २०११-१२ च्या सुधारित दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.००%** येत आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता मा. छाननी समितीसमोर निर्णयास्तव दि.१८/०१/२०१२ रोजी सादर केला असता मा.छाननी समितीने सदरचे काम मे. बेस्ट कंन्स्ट्र.,अहमदनगर यांना निविदा दरापेक्षा **१५.४१%** जादा दराने देणेची शिफारस करण्यात आलेली आहे. (सन २०११-१२ च्या सुधारित दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.००%** जादा येत आहे) त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.४५,७२,७९५/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां. २०११-२०१२ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.४५,७२,७९५/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | निरंक |
| १५ | नविन परिपत्रकान्वये सन २०११-१२ च्या सुधारित दराशी नुसार अधिक्याची टक्केवारी ( १४/१२ x१००) | **०.००%** |

तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदारास निविदा दरापेक्षा **१५.४१%** जादा (सन २०११-१२ च्या सुधारित दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.००%** जादा) दराने देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस सविनय सादर./**अ**

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल

मा.इनचार्ज अभियंता :- क. अभियंता यांच्या प्रस्तावान्वेय मान्यतेस्तव सादर

शहर अभियंता :- अहवालाप्रमाणे मान्यतेस सादर

अंतर्गत लेखा परिक्षक :- :- प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर

मा.उपायुक्त (कर/ सा.) साहेब :-प्रस्तावीत "अ" प्रमाणे निविदा मंजुरीस्तव , मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. दि.२०/१/२०१२

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२१/१/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- पोहच रस्ते विकसित करणे अंतर्गत बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रुक ते आदर्श पार्क, पुणे हायवे व विनायक नगर व बुरूडगांव रोड बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कावरे द.ह. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पोहच रस्ते विकसित करणे अंतर्गत बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रुक ते आदर्श पार्क,पुणे हायवे व विनायकनगर व बुरूडगांव रोड बालाजीकॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्र.,अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा १५.४१%जादा(सन२०११-१२च्या सुधारित दरसुचीशी तुलना करता सदरचा दर०.००%जादा)दराने देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ्र सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ्र सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका